दै. देशोन्नती

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे कत्तलीसाठी घरात कोंडून ठेवलेल्या आठ गोवंशांना जीवदान



देशोन्नती वृत्तसंकलन...

**देगलूर** ■ कत्तल करण्यासाठी घरात कोंडून ठेवलेल्या आठ गोवंशाची देगलूर पोलिसांनी तत्परतेने सुटका केल्यामुळे त्यांचे प्राण वाचले आहे. रात्री उशिरा या सर्व वंशाला मुखेड येथील गोशाळेत पाठविण्यात आले आहे.

१७ मार्च रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास शहरातील घुमटबेस परिसरातील एका घरात ६ बैल व २ गोऱ्हे असे एकूण ८ गोवंश कत्तलीसाठी कोंडून ठेवल्याची देगलूर पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्निल घोंगडे हे ठाण्यातील पोलिस कर्मचारी सुधाकर मलदोडे, साहेबराव सगरोळीकर, आप्पासाहेब जगताप यांना घेऊन सदर ठिकाणी गेले. त्यांनी आरोपीच्या ताब्यातील सर्व गोवंशाला देगलूर पोलिस ठाण्यात आणून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ताब्यात घेतलेल्या सर्व गोवंशाला रात्री उशिरा देगलूर पोलिसांनी मुखेड येथील गोशाळेत पाठविले आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नरहरी फड करीत आहेत. (ता.प्र.)

दै. गोदातीर

# नांदेडमध्ये आचारसंहिता भंगाचा पहिला गुन्हा दाखल

**नांदेड-** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता शनिवारपासून लागू झाली आहे. त्यातच राज्यातील आचारसंहिता भंगाचा पहिला गुन्हा नांदेड जिल्ह्यात दाखल झाला आहे. मुखेडमध्ये एका अभियंत्याने कर्तव्यात कसूर केल्याच्या कारणावरून आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवार दि. १६ मार्चपासून आचारसंहिता लागू झाली आहे. त्यासाठीची आचारसंहिताही लागू झालेली असून राज्यातील आचारसंहिता भंगाचा पहिला गुन्हाही दाखल झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड विधानसभा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यात कसूर केल्यामुळे हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लेंडी प्रकल्पाचे उपविभागीय अभियंता एल. जे. जाधव यांच्यावर हा गुन्हा दाखल झाला आहे. उप अभियंता जाधव यांच्यावर मुखेड विधानसभा मतदारसंघातील झोन क्रमांक २५ निवळीकरिता क्षेत्रिय अधिकारी पदाची नियुक्ती दिली होती. २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या निवडणूक कार्यशाळेत ते गैरहजर राहिले. त्यानंतर व्हीएम टू, व्हीएम थ्री हा अहवालसुद्धा त्यांनी पाठवला नाही. उलट पाठविलेल्या नोटिसीला उत्तर सुद्धा दिले नाही.

अखेर या प्रकरणात त्यांनी निवडणूक आयोगच्या सूचनेनुसार आपले कर्तव्य केले नसल्याचा ठपका ठेवत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुखेडचे नायब तहसीलदार अशोक लबडे यांच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरून कलम १३४ लोकप्रतिनिधी अधिनियम १९९१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार गोटे करत आहेत.

...घडला आहे.